MAHARASHTRA MANDAL OF SOUTH FLORIDA

# दर्पण

September 2024


**दर्पण संपादकीय विभाग**

**संपादिका:** सुजाता साठे

sujatass@hotmail.com



**उप-संपादिका:** राजश्री पालकर

rajipalkar@aol.com



**मांडणी/सजावट:** अपर्णा मटंगे




*अनुक्रमणिका*


| | शीर्षक | लेखक | पान क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | संपादकीय | सुजाता साठे | १ |
| २ | MMOSF चे पान | अपर्णा मटंगे | २ |
| ३. | वेगळ्या वाटेवर | सुजाता साठे | ३ |
| ४ | साहित्याचे माणिकमोती | ललिता गंडभीर, अमित नगरकर, लाभेश शेवलकर, अरुणा पाटणकर सोनाली क्षीरसागर शिंगण | ७ |
| ६. | खाना खजाना | डॉ. शुभांगी कुंभार | २२ |
| ७. | सिनिअर्स कॉर्नर | अमित नगरकर | २५ |
| ८ | प्रश्नमंजुषा | रसिका जोशी | २८ |
| ९ | उत्तर सांगा पाहू? (उत्तर) | रसिका जोशी | २९ |


*अस्वीकरण - या अंकात प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी व चित्रांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.*

# संपादकीय

सप्टेंबर आला की सगळ्यांची गणपतीच्या स्वागताची तयारी सुरु होते. वाजत गाजत गणपती घरी आणायचा, सजवलेल्या मखरात बसवून आरती करायची, मोदकांचा नैवेद्य दाखवायचा आणि १० दिवसांनी 'पुढच्या वर्षी लवकर या' म्हणून बाप्पाचे विसर्जन करायचे. काहीजणांकडे गौरीही थाटामाटात बसवतात. आणि नंतर लगेच दसरा, दिवाळीचीही चाहूल लागते.

पण ह्या सगळ्या सणांच्या गडबडीत आपल्या सभोवती आणखीही महत्वाच्या घटना घडत आहेत. ह्या वर्षीच्या नोव्हेंबरमध्ये अमेरिकेच्या अध्यक्षपदाची निवडणूक आहे. दोन्ही पक्षांचा जोरदार प्रचार चालू आहे. तुम्ही कुठल्याही पक्षाचे असलात तरी एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते. ह्या वर्षीच्या निवडणुकांमध्ये भारतीय वंशाच्या लोकांचा खूप मोठा प्रभाव जाणवतो. निकी हेली, विवेक रामस्वामी ह्यांनी रिपब्लिकन पक्षाच्या प्रायमरीज मध्ये भाग घेतला. व्हाईस प्रेसिडेंटची निवडणूक लढवणाऱ्या जे. डी. व्हान्स ह्यांची बायको उषा चिलुकूरी भारतीय वंशाची आहे. तर आता डेमॉक्रॅटिक पक्षाची उमेदवार म्हणून भारतीय आई असलेली कमला हॅरीस प्रेसिडेंट होण्याची शक्यता आहे. भारतातून इथे आलेल्या पहिल्या पिढीची मुले, नातवंडे, असे अनेकजण राजकारणात भाग घेतांना दिसतात. रोहित खन्ना, प्रमिला जयपाल, राजा कृष्णमुर्थी , श्री ठाणेदार काँग्रेसमध्ये निवडून आले आहेत. तर विवेक मुर्थीची सर्जन जनरल म्हणून नेमणूक झाली आहे. हा बदल नक्कीच स्वागतार्ह आहे. ह्यामुळे भारतीय लोकांचे प्रश्न सुटायला मदत होईल. ह्या वर्षीच्या निवडणुका शांतपणे पार पडतील अशी आशा करू या.

'दर्पण'च्या तिसऱ्या अंकातील वेगवेगळे लेख, कविता, कोडे, पाककृती तुम्हाला आवडल्या का आम्हाला कळवा आणि नवीन साहित्यही जरूर पाठवा. तसेच एखादा लेख आवडला तर त्या लेखकाला जरूर कळवा. त्यामुळे नवीन लेखकांना प्रोत्साहन मिळते व आणखी लिहायला हुरूप येतो. आपल्या कम्यूनिटी ग्रुपवर लिहिले तरी चालेल.
धन्यवाद!

**लेखिका - सुजाता साठे**
sujatass@hotmail.com

# MMOSF चे पान

नमस्कार मंडळी,

दोन महिन्यांच्या उन्हाळ्याच्या सुट्टी नंतर आपण सर्वजण आपल्या दैनंदिन जीवनात रुजू झालो असू. ह्या दोन महिन्यांच्या कालावधीत MMOSF ने देखील सुट्टी घेतली. ऑगस्ट महिन्यात ब्रॉवर्ड व पाम बीच च्या शाळा सुरु झाल्या. त्याचप्रमाणे सुरू झाली आपली मराठी शाळा!! पाम बीच काउंटी च्या लेकवर्थ ला आपली शाखा २०२२ पासून कार्यरत आहेच. ऑगस्ट २०२४ पासून मराठी शाळेची दुसरी शाखा ब्रॉवर्ड काउंटी च्या डेव्ही मध्ये सुरु झाली. दोन्ही शाखेत उत्तम प्रतिसाद मिळाला आहे. आपल्या मंडळा मधील सभासद, शाळेचे स्वयंसेवक, शिक्षक आणि मदतनीस म्हणून कार्यभार सांभाळतील. ह्या वर्षीच्या शाळेचा श्री गणेशा ऑगस्ट २५ तारखेला झाला.

ऑगस्ट सप्टेंबर म्हणजेच श्रावण भाद्रपद महिना आला की सर्वांना चाहूल लागते पारंपरिक सणवार, सोहळे, आणि अर्थातच आपल्या लाडक्या गणपती बाप्पांच्या आगमनाची. यंदाच्या वर्षी MMOSF ने गणपतीचा कार्यक्रम एका सोहळ्याच्या रूपात आयोजिला आहे. ढोल ताशाच्या गजरात गणपती बाप्पांची वाजत गाजत मिरवणूक, नंतर यथासांग पूजा, अथर्वशीर्ष आणि आरती व महाप्रसाद, मग दुपारचे जेवण, चहापान आणि मनोरंजनाचा कार्यक्रम. असा चौफेर बेत यंदाच्या गणेशोत्सवात तुम्हाला पाहायला मिळेल. तत्संबंधी सर्व माहिती आपल्या MMOSF WhatsApp ग्रुप वरून दिली जात आहे.

ऑक्टोबर महिन्यात *'Kojagiri on the beach'* हा देखील आपला वार्षिक कार्यक्रम असतो. यंदा देखील हा कार्यक्रम शनिवार, ऑक्टोबर १९ रोजी योजण्यात येणार आहे. त्या संबंधीची संपूर्ण माहिती देखील WhatsApp वर दिली जाईल.


शनिवार, नोव्हेंबरच्या ९ तारखेला आपण एक खास आणि आगळा वेगळा दिवाळीचा कार्यक्रम करणार आहोत. झी मराठी वर अनेक वर्षे लोकप्रिय 'होम मिनिस्टर' ह्या मालिकेच्या धर्तीवर ***'MMOSFची गृहस्वामिनी'*** हा अनोखा आणि अद्वितीय कार्यक्रम असणार आहे. होम मिनिस्टरच्या कार्यक्रमाचे समीकरण जसे पैठणी शिवाय संपूर्ण होत नाही, तसेच आपल्या MMOSF च्या गृहस्वामिनी ला देखील मिळणार आहे, $५०० डॉलर्स ची Swarovski पैठणी *'The Silk Trends'* ह्यांच्या सौजन्याने. हो! हो! प्रथम पारितोषिक $५०० ची पैठणी; दुसरे पारितोषिक $१५० ची पैठणी आणि तिसरे पारितोषिक $१०० ची सिल्क साडी. पहिले आणि दुसरे पारितोषिक 'The Silk Trends' ह्यांचा सौजन्याने असेल. लवकरच आम्ही ह्या अभूतपूर्व, न भूतो न भविष्यती अश्या कार्यक्रमाची रूपरेषा जाहीर करू. तर मंडळी, छान छान कार्यक्रमांना सज्ज होऊ या. नेहेमीप्रमाणे सर्वांना विनंती आहे की वरील दिलेल्या कार्यक्रमात मोठ्या संख्येने उपस्थित राहा. तुमचा सहभाग, हाच आमचा आनंद आहे!!

लवकरच भेटू या, गणपती बाप्पांच्या सोहळ्याला. यायला विसरू नका. तोपर्यंत निरोप घेऊ या.

**लेखिका - अपर्णा मटंगे**
president@mmosf.org

# तालमय नादमय

आम्ही १२ वर्षांपूर्वी साऊथ फ्लोरिडात राहायला आलो तेव्हापासून MMOSF च्या प्रत्येक गाण्याच्या कार्यक्रमाला तबल्यावर सुधीर लिमये असायचा. नंतर तो आणखी वेगवेगळ्या ठिकाणी तबल्याची साथ करतांना दिसला. कधी गुजराथी लोकांच्या गरब्याच्या कार्यक्रमाला, तर कधी देवळात भजनाच्या साथीला तर कधी AIA च्या कार्यक्रमाला. प्रत्येकजण तो किती चांगला तबला वाजवतो ह्याबरोबरच त्याच्या नम्र, मृदुभाषी आणि शांत स्वभावाचेही कौतुक करायचा. तर असा हा लोकप्रिय तबलावादक सगळ्यांचाच आवडता आहे. त्याची काय नवी ओळख करून देणार असा तुम्हाला प्रश्न पडेल. पण कितीजणांना त्याचा संगीताचा प्रवास कसा झाला हे माहिती आहे? आज त्याने मायामी भागातील सर्व भारतीय लोकांत स्वत:चे एक उत्तम तबलावादक म्हणून स्थान निर्माण केले आहे. तर आपण त्याला गृहीत न धरता त्याचे कौतुकच केले पाहिजे. नाही तर 'घरकी मुर्गी दालबराबर' असे व्हायचे! तर सुधीरबरोबर मारलेल्या ह्या गप्पातून त्याचा प्रवास जाणून घेऊ या.



**मी**: "सुधीर, तुला संगीताची आवड कधीपासून लागली? तुमच्या घरी संगीताचे वातावरण होते का?"

**सुधीर:** "मला आठवते माझ्या बालपणी पुण्याला गणपती उत्सवात ढोल आणि ताशा पथके असायची. मला त्याचे खूप आकर्षण होते. तसेच सकाळी शिकवणीला जातांना देवळांमधून पखवाज आणि चौघड्याचे आवाजाही खूप आवडायचे. घरी हिन्दी-मराठी संगीत रेडिओवर चालू असायचे. या सगळ्या वातावरणामुळे मी संगीत क्षेत्राकडे आकर्षित झालो. आमच्या घरी चित्रपट संगीत ऐकायचे एवढेच पण मी ऐकले आहे की माझे आजोबा उत्तम सतार वाजवत असत."

**मी:** " तू तबला या वाद्याकडे कसा वळलास?"

**सुधीर:** "शालेय शिक्षण सरस्वती विद्यालय आणि नूतन मराठी विद्यालय इथे पूर्ण करून मी कॉलेजसाठी फर्ग्युसन कॉलेजला प्रवेश घेतला. इथे मला संगीत क्षेत्रातील २-३ मित्र मिळाले. ते हार्मोनियम आणि गाणे शिकत होते. आम्ही सगळे एकत्र बसून कॉलेजच्या गॅदरिंगमध्ये काहीतरी सादर करायचे ठरवले. माझे कॉलेजच्या बेंचवर ठेका धरून वाजवायचे कौशल्य सगळ्यांनाच माहिती होते! तर मी आव्हान म्हणून तबला वाजवायचे ठरवले. गाणे होते वसंतराव देशपांड्यांचे 'तेजोनिधी लोहगोल'. मी खूप प्रयत्न करून तबल्याचे काही सुरवातीचे सोपे बोल स्वत:च शिकलो आणि त्या गाण्याला साथ केली. तेव्हापासून मी ठरवले की हेच वाद्य शिकायचे."

इथे सुधीरचे एक वैशिष्ठ नमूद केले पाहिजे. त्याला संगीताची जाण तर आहेच पण त्याचबरोबर कला शिकण्यासाठी कितीही कष्ट करायची त्याची तयारी असते. तबल्यासारखे अवघड वाद्य स्वत:च शिकून गाण्याला साथ करणे हे त्याचे कलेबद्दलचे प्रेम आणि निष्ठा दाखवून जाते.

ठरवल्याप्रमाणे सुधीर तबला शिकू लागला. त्याचे गुरु सुप्रसिद्ध पंडित सुरेश सामंत ह्यांच्याकडे त्याने ५ वर्षे (मध्ये कांही ब्रेक घेऊन) शिक्षण घेतले.

**मी:** "तुझ्या गुरूबद्दल काय सांगशील?"

**सुधीर:** "पंडित सुरेश सामंत अतिशय कडक गुरु म्हणून प्रसिद्ध होते. कोणीही नवीन विद्यार्थी घेतांना त्याला शिकण्यात किती रस आहे आणि त्याची मेहेनत घेण्याची तयारी आहे की नाही हे ते बघत. बऱ्याच कसोटीनंतर त्यांनी मला शिकवायचे कबूल

केले. ते दिल्ली-फरूखाबाद घराण्याच्या पद्धतीने शिकवत असत. दिल्ली घराणे 'बंदबाज' (closed sound playing) आणि 'चाटी' पद्धतीने तबला वाजवतात. 'चाटी' पद्धतीत फक्त हाताच्या दोन बोटांनी तबला वाजवतात. त्याला 'दो उंगलीयोंका बाज' असेही म्हणतात. तर फरूखाबाद पद्धतीत दिल्ली, पुरब आणि लखनौ ह्यांचे मिश्रण आहे. सुरेशजींकडे मला 'बंदबाज' आणि 'खुलाबाज' (open sound playing) अशा दोन्ही पद्धती शिकायला मिळाल्या. तसेच तबला वादनात फक्त तबला वाजवणारे (solo प्रोग्रॅम)) आणि साथ करणारे असे दोन पद्धतीने वाजवणारे लोक असतात. माझा कल संगीताबरोबर साथ करण्याकडे आहे."

**मी:** "मग तबला शिकायला लागल्यावर गाण्यांना साथ करू लागलास का?"

**सुधीर:** "हो. कॉलेजमध्ये माझ्यासारखी संगीताची आवड असणाऱ्या मित्रांबरोबर एक ऑर्केस्ट्रा तयार करून आम्ही वेगवेगळ्या कॉलेजच्या स्पर्धांमध्ये भाग घेऊ लागलो आणि बक्षिसेही मिळवली. एकदा कलकत्याच्या अटीतटीच्या स्पर्धेत आम्हाला पहिले बक्षीस मिळाले. त्यावेळी सर्व फर्ग्युसन कॉलेजच्या मुलांनी आमची जोरदार मिरवणूक काढून आनंद साजरा केला होता. ह्या काळात मी ६ महीने ड्रम्स वाजवायलाही शिकलो. मी पुण्यातल्या काही व्यावसायिक ऑर्केस्ट्रांबरोबरही कार्यक्रम केले आहेत."

फर्ग्युसन कॉलेजमधून फिजिक्स व इलेक्ट्रॉनिक्स मध्ये पुणे विद्यापीठाची मास्टर्सची पदवी मिळाल्यावर पुण्याला Forbes Marshall ह्या कंपनीत तो नोकरी करू लागला. पुढे त्याच कंपनीत असतांना २००१ मध्ये त्याला अमेरिकेत फ्लोरिडात येण्याची संधि मिळाली. नंतर २००२ मध्ये अपर्णा कर्वे हिच्याशी त्याचे लग्न झाले. इथे आल्यावर त्याला वेस्टर्न संगीतातही रस वाटू लागला.







**मी:** "मग इथे आल्यावर तबला वाजवणे सुरू ठेवलेस का?"

**सुधीर:** "हो. माझी संगीत क्षेत्रातील अनेक लोकांशी मैत्री झाली आणि आम्ही संगीत मैफिली करू लागलो. MMOSF ने मला खूप वेळ कला सादर करायला संधी दिली. ह्याच वेळी माझी एका Jazz आर्टिस्टबरोबर ओळख झाली. Darryll Dobson हा फ्लूट व गिटार वाजवतो आणि त्याला Fusion म्युझिक करायची इच्छा होती. Darryll, संजय चंद्रन हा व्हायोलिन वादक आणि मी असे मिळून आम्ही एक जॅझ अल्बम केला. त्याचे नांव 'Third Alignment' असे आहे. मला फ्यूजन म्युझिक करतांना वेगळी वादनशैली आत्मसात करायचा अनुभव मिळाला."

**मी:** "आतापर्यंत किती कार्यक्रमांना साथ केली आहेस?"

**सुधीर:** "असे नक्की सांगता येणार नाही. पण ३०० च्यावर कार्यक्रम केले असतील. मला गुजराती, केरळी, पंजाबी, तमिळ अशा वेगवेगळ्या प्रांतातील लोक साथीला बोलावतात. गुजराथी गरबा, पंजाबी लोकांची लोरी, केरळी लोकांचे ओणम अशा वेगवेगळ्या सणांच्यासाठी ते मला बोलावतात. शिवाय संगीत नाईट, गझल नाईट असे कार्यक्रमही मी करतो. नुकताच एक तमिळ लोकांच्या सिनेसंगीताचा कार्यक्रम मी केला."

**मी:** "तमिळ भाषा येत नसतांना, त्यांची गाणी माहिती नसतांना तू कशी काय साथ करू शकतोस?"

**सुधीर:** "मला एकदा गाणे ऐकले की ते तबल्यावर कसे वाजेल, हे लगेच लक्षात येते. एकदा, फार तर दोन वेळा रिहर्सल पुरे होते. भाषेची अडचण येत नाही. कारण संगीताला भाषा नसते."

मी हे ऐकून थक्कच झाले.

**मी:** "आतापर्यंत कोणा प्रसिद्ध कलाकारांना (Professional) साथ केली आहेस का?"

**सुधीर:** "हो, बऱ्याचजणांना मी साथ केलेली आहे. श्रीधर फडके, अनुराधा मराठे, त्यागराज खाडीलकर, पंडित आजोय बॅनर्जी, उस्ताद इकबाल अहमद, डॉक्टर मोनिका शाह अशा नामवंत कलाकारांना साथ करायची संधी मला मिळाली."

अनेक लोकांनी तबला शिकण्याची ईच्छा व्यक्त केल्याने सुधीरने २००५ मध्ये तबला शिकवायला सुरवात केली. अनेक विद्यार्थ्यांनी त्याच्याकडे शिक्षण घेतले आहे आणि गेली १५ वर्षे निरंतर सेवा चालू आहे.
**मी:** "तुझ्या विद्यार्थ्यांना काय सल्ला देशील?"
**सुधीर:** "आत्ताच्या मुलांना नवीन टेक्नॉलॉजीमुळे शिकणे सोपे झाले आहे. पण तरीही सतत रियाज करणे आणि कलेसाठी पूर्णपणे वाहून घेणे ह्याला पर्याय नाही. कुठलीही कला शिकणे ही जन्मभराची साधना असते. त्यामध्ये पळवाट काढता येत नाही."

सुधीरकडे १२ वर्षे तबला शिकलेला अंजन जोशी त्याच्याबद्दल काय म्हणतो ते बघू या.
*Anjan:* "Sudhirji is very patient with his students. Also, he is very passionate about his craft, a perfectionist and detail orientated. I have learned a lot from him and have accompanied him on different programs. He also gives his students freedom to explore. I have done a fusion music cover with Sia in her album 'Chandelier'."

त्याचा आणखी एक विद्यार्थी रिषब अय्यर हा १६ वर्षांचा आहे. तो १०+ वर्षे सुधीरकडे तबला शिकतो आहे.
*Rishab says*, "I have very high respect for Sudhirji. I admire his ability to keep students engaged and enthusiastic about learning. He is very patient and committed, ensuring his students fully grasp the lessons before moving on. I appreciate Sudhirji's dedication, as he always invests extra time and effort to prepare his students for performances, ensuring they are ready to give their best."

*Rishab's father, Rajesh*, adds, "Sudhirji's commitment extends beyond his students. He is passionate about music and voluntarily assists anyone interested in learning. Under Sudhirji's guidance, several young musicians from South Florida recently competed in and won prizes at 'Indian Raga.' While Tabla is his first love, Sudhirji's knowledge spans various instruments, including Western drums, Sitar, Veena, and Santoor. He has also actively participated in local events such as 'Namaste,' 'AIA,' and 'Ekal Vidyalaya,' further showcasing his dedication to the music community."




सुधीरचे संगीतप्रेमी मित्र शिरीष पाटणकर आणि अजित व मनीषा दामले ह्यांना सुधीरबद्दल किती प्रेम आहे ते त्यांच्या खालील उद्गारांमधून दिसून येईल.

*शिरीष पाटणकर:*
"सुधीरची आणि माझी ओळख आमच्या दोघांच्या संगीत प्रेमामुळे झाली. आम्हा काही हौशी गाणाऱ्या मंडळींचा ग्रुप आहे. पूर्वी मी यथाशक्ती तबल्याची साथ करत असे. सुधीरची ओळख झाल्यावर त्याच्या उत्तम तबला वादनाने आम्हा सर्वांचे गाणे अधिक सुश्राव्य झाले. त्याला संगीताची चांगलीच जाण असल्याने तबल्याची संगत कशी करावी म्हणजे गाणे/ वाजवणे आणखी उठून दिसेल ह्याचा अचूक अंदाज तो

बांधतो. त्याने मला सतारीबरोबरही साथ केली आहे. आम्ही MMOSF, FAU आणि NPR रेडिओच्याMiami station वर एकत्र प्रोग्राम केले. सुधीर साथीला नसला तर आमचा कार्यक्रम होऊच शकत नाही."

*अजित आणि मनीषा दामले:*

"सुधीरची आणि आमची ओळख तो फ्लोरिडात आल्यावर काही दिवसातच झाली आणि त्यानंतर त्याचे तबलावादन ऐकले. २००३ पासून तो अजितच्या संतूरच्या कार्यक्रमात आणि आमच्या गाण्यात साथीला असतो आणि त्याच्या तबलावादनामुळे कार्यक्रमातील रंगत वाढते. अगदी साडे सहा मात्रांचा अर्धा जैताल असो किंवा पंधरा मात्रांचा पंचम सवारी ताल असो, सुधीर असे अनवट ताल वाजवायला नेहमीच आनंदाने तयार होतो. त्यामुळे अजितला संतूर वाजवताना किंवा आम्हाला गातांना नवा प्रयोग करताना दडपण येत नाही.

त्याला कुठचेही नवीन वाद्य वाजवायची विनंती केली की तो उत्साहाने तयारीला लागतो. सुधीरला आणि आम्हाला दोघांना आर. डी. बर्मन यांचे संगीत फार आवडते. त्यामुळे आम्ही त्याला गाताना पंचमदांनी त्यांच्या गाण्यात वाजवलेली तालवाद्ये आणून ती वाजवायची विनंती करतो आणि तो ड्रमपॅड्स, पखवाज, किंवा नेपाळी मादल, मादल तरंग, इंडोनेशियन Aangklung, आणि आफ्रिकन रेसो सारखी वाद्ये सुद्धा अगदी सहजपणे वाजवू शकतो. आम्ही साऊथ फ्लोरिडा येथे असे सादरीकरण रसिकांसमोर खूप वेळा केले आहे. हे सर्व सुधीरमुळे शक्य होते."



आज सुधीर, अपर्णा व त्यांची १२ वर्षांची मुलगी मिहीका ह्यांच्याबरोबर Boca Raton इथे राहतो. तो Dover PSG Corporation मध्ये Director of Engineering म्हणून काम करतो. त्याची फिजिक्स व इलेक्ट्रॉनिक्समध्ये मास्टर्सची डिग्री असल्याने त्याच्या सध्याच्या कामासाठी (अल्ट्रा साऊंड टेक्नॉलॉजी) पूरक आहे. त्याला त्याच्या करियरमद्धे आणि तबलावादक म्हणून असेच यश मिळो ही सदिच्छा!

सुधीरची ई-मेल: sudhirlimaye@yahoo.com

**लेखिका - सुजाता साठे**
sujatass@hotmail.com

# आईचे लग्न

शुक्रवारी रात्री पार्टीला गेलो होतो. "उद्या सुट्टी" असं म्हणून "उशिरा उठायच" असं ठरवून झोपलो होतो. पहाटे फोन वाजला. उचलू नये असं वाटत होत तरी उचलला. आई-बाबा तीन महिन्यांसाठी भारतात गेले होते. 'कदाचित त्यांचा फोन असेल' असं झोपेतही वाटल. फोनवर अवीमामा होता.

"राहू, जागा आहेस का?"

"नाही. थोड्या वेळाने फोन करू का?" मी विचारले.

"तुला उठायलाच हवं राहू, वाईट बातमी आहे" मामा म्हणाला.

'वाईट बातमी' म्हटल्यावर माझी झोप खाडकन उडाली.

"काय झालं मामा?" मी विचारले. मग माझ्या लक्षात आले की मागे खूप कलकलाट चालला होता. मागून आवाज आला. आई बोलत होती.

"मी सांगते" ती म्हणाली. "राहू, आपल्याला सगळं धीराने घ्यायला हवं. काल रात्री तुझे बाबा अकस्मात कोसळले. लगेच त्यांना हॉस्पिटलात नेल. पण कांही उपयोग झाला नाही. ते आता आपल्यात नाहीत. त्यांचे अंत्यसंस्कार तुलाच करायला हवेत. आम्ही नीताला फोन करायचा प्रयत्न करतोय. पण फोन लागत नाही. तू तुझी बॅग पॅक कर. येण्यापूर्वी तुझा पासपोर्ट मी तुला दिला होता. नीताचा तिच्याकडे आहे. अजून ती झोपलेली असणार. तू तिला उठव आणि तुम्ही मिळेल ते पहिले विमान पकडून मुंबईला या. पैशाची काळजी करू नकोस. समजल ना राहू?"

"समजल" मी म्हटले आणि बिछान्यावर कोसळलो. तोंडातून शब्द फुटत नव्हते.

"राहू, स्वतःला सावर" ती म्हणाली. आई सावरलेली दिसत होती. पण माझी छाती धडधडत होती. कांही सुचत नव्हत. आईने फोन ठेवला. 'आता आईचे कसे होणार?' माझ्यासमोर मोठ्ठा प्रश्न उभा राहीला. आणि माझे प्रकृती जपणारे, रोज जिमला जाणारे, बाबा कसे गेले? त्यांना काय झाल? मी एक कप चहा केला, सिरियल खाल्ल आणि भराभर बॅग पॅक केली. पासपोर्ट घेतला. ऑफिसला फोन केला. "दोन आठवडे भारतात जातोय" म्हणून सांगितले. माझे वडील गेले कळल्यावर त्यांनी परवानगी दिली.

मग नीताच्या कॉलेजच्या दिशेने कार वळवली. नीताच्या डॉर्मचा दरवाजा आणि तिच्या खोलीचा दरवाजा उघडाच होता. मी तिला बाहेरून हाका मारल्या. शेवटी दरवाजा ढकलून आत गेलो. तिला हलवले. ती गाढ झोपेत "कोण आहे?" म्हणाली. "नीता उठ, वाईट बातमी आहे" मी सांगितले. आता ती जागी झाली. "आपले बाबा गेले." असे मी सांगितल्यावर ती ताडकन उठली आणि तिने रडायला सुरुवात केली.

"आता आईच कस होणार?"

"नीता, तू चटकन बॅग पॅक कर. मी विमानाची तिकीट काढतो. तुझा पासपोर्ट घे"

नीताने डोळे पुसले आणि ती तयारीला लागली. मुंबईच्या विमानतळावर माझा मामेभाऊ आम्हाला न्यायला आला होता.

“आई कशी आहे?” मी त्याला विचारले.

“धीराने घेतायत.” तो म्हणाला.

कधी नव्हे ते नीताच तोंड बंद होत. घरी पोचताच तिने आईच्या गळ्यात पडून रडायला सुरुवात केली. आईचे डोळे भरून आले. “नीता, आता रडायला वेळ नाही.” ती म्हणाली. तुम्ही आंघोळी करा. मग राहूला अंत्यसंस्कार करायचे आहेत.”

पुढे सगळं एवढ्या गतीने घडले की मला काहीच आठवत नाही. अर्धवट झोपेत मी सगळे विधी केले. नीता माझ्या मागे मागे होती. तिच्या स्त्रीमुक्तीवादाला या वेळी तरी तिने लगाम घातला होता. तिला अन्त्यसंस्कारात भाग घ्यायला मिळाला नाही तरीही! दोन दिवसांनी घरी कांही विधी करून काका, मामा, मी व नीता अस्थीविसर्जनाला नाशिकला गेलो. परत येताच आईने सांगितलं, “तुझे मोठे काका पुण्याला तुझ्या आजोबांच्या बंगल्यात राहतात. ते व तुझी मोठी आत्या आजारपणामुळे येऊ शकले नाहीत. त्यांना तुम्ही दोघ भेटून या.”

पुण्याला गेल्यावर नीताने व मी काकांना नमस्कार केला.

“बाबूच्या ऐवजी देवाने मलाच का नाही नेल?” काका म्हणाले. मग आत्याला भेटायला गेलो. तीही तेच म्हणाली. आमच्या सोबत काकांची नात शम्मी होती.

“बाबू आजोबा गेल्याच ऐकून ते दोघेही सारखे रडतायत.” ती म्हणाली. एक रात्र पुण्याला राहून आम्ही मुंबईला परतलो.

आई म्हणाली, “तुम्ही दोघ तेरावे झाल की परत जा. मी एका महिन्याने येते.” त्याप्रमाणे आम्ही दोघे तेरावे झाल्यावर परत आलो. नीताला तिच्या डॉर्ममध्ये पोचवली. उतरतांना ती मला मिठी मारून रडली. मी घरी आलो आणि आंघोळ करून चोवीस तास झोपलो. दुसऱ्या दिवशी कसाबसा कामाला गेलो. मन उदास होते. सहकारी भेटून सहानुभूती व्यक्त करीत होते.

आईला मी मुंबईला फोन करून विचारले, “मी तुला घ्यायला येऊ का?”

“नको, गौरीमावशी माझ्याबरोबर येते आहे”, ती म्हणाली.

मी सुटकेचा निश्वास टाकला. एका महिन्याने गौरीमावशी व आई ह्या दोघी आल्या. मी व नीताने घर साफ केले. चायनीज जेवण आणून ठेवले. नीताने बाबांच्या फोटोला हार घातला होता. आई व गौरीमावशी दमलेल्या होत्या. जेवण झाल्यावर मी घरी परतलो. पण नीता एक रात्र राहिली.

गौरीमावशी एक महिना राहिली. आईने आणि मी लॉकरमध्ये जाऊन बाबांची कागदपत्रे बघितली. त्यांनी माझ्यासाठी थोडे पैसे ठेवले होते. नीताच्या कॉलेजखर्चाची व्यवस्था केली होती. बाकी सर्व आईला दिले होते.

गौरीमावशी जाण्याच्या आधी मी आईला विचारले, “आता तू घरी एकटी असणार आहेस. मी परत घरी राहायला येऊ का?”

ती म्हणाली, “मुळीच नको. मी एकटी राहीन. माझा बाग-बगीचा आहे. शिवाय शेजाऱ्यांच्या ओळखी आहेत. इथून तुला कामावर पोचायला एक तास तरी लागेल.” मग ती म्हणाली, “बाबा रिटायर झाल्यावर ‘प्रवास करायचा’ म्हणून माझी लायब्ररीतली अर्ध्या दिवसाची नोकरी मी सोडली. आता ती मला परत मिळेलच. गौरीमावशी गेली की मी कामावर जायला लागणार आहे. माझ्या नोकरीचा पगार पुरेसा नाही. मी मला लागतील तसे पैसे काढत जाईन. नोकरीचे तास वाढवून मिळाले तर हेल्थ इन्शुरन्स मिळेल.” एकूण आईने पूर्ण विचार करून निर्णय घेतला होता.

गौरीमावशी भारताला परतल्यावर मी आणि नीता आईला रोज रात्री फोन करू लागलो. एका आठवड्याने तिने आम्हा दोघांना सांगितले, “तुम्ही आठवड्यातून एकदा फोन करत जा. जरूरी वाटली तर मीच तुम्हाला फोन करीन.” एक दिवस तिने फोन करून मला सांगितले, “मला लायब्ररीत पूर्ण वेळाची नोकरी मिळतेय. शनिवार रविवार काम करावे लागेल. पण हेल्थ इन्शुरन्स मिळतोय. इन्शुरन्सचे पैसे वाचतील.” बाबांच्या लाईफ इन्शुरन्सचे पैसे पण तिला मिळाले.

सहा महिन्यांनी ती मैत्रिणींबरोबर एक आठवडा क्रूझला जाऊन आली. थॅंक्सगिवींग आणि ख्रिसमसला आम्ही तिघंच होतो. खूप आमंत्रण आली होती. पण आईला कुठेच जायचे नव्हते. एक दिवस आईने मला व नीताला घरी बोलावले. तिने आमच्या आवडीचा स्वयंपाक केला होता. जेवतांना ती म्हणाली, “तुमच्या बाबांच वर्षश्राद्ध त्यांच्या भावांना करायच आहे. मी टाळायचा प्रयत्न केला. इथेच करते म्हटल. तुमच्या बाबांचा ह्या परंपरांवर विश्वास नव्हता. पण मला तुमच्या काकांचे मन दुखवायचे नाही. त्यांना ते पुण्यालाच करायचे आहे. आपल्या तिघांना एका आठवड्यासाठी तरी पुण्याला गेले पाहिजे.”

आम्ही दोघांनीही जायची तयारी केली. आई, नीता व मी पुण्याला गेलो. वर्षश्राद्धात काकांनी सांगितले ते सर्व मी केले. खूप लोक भेटायला आले होते. त्यातल्या एका साठीतल्या पुरुषाने मला अंगणात बोलावले आणि मला एक पत्र दिले. “तू अमेरिकेला गेल्यास की हे पत्र शालूला दे.” तो म्हणाला. त्याने ‘शालू’ हे आईचे माहेरचे नांव वापरले होते, हे माझ्या लक्षात आले. मी ते पत्र माझ्या बॅगेत ठेवले.

आई आम्ही परतल्यावर दोन आठवड्यांनी परत आली. तिला घरी पोचवून मी परतलो. कारण मला खूप काम होते. पुढच्या शनिवारी मी आणि नीता तिला भेटायला गेलो. जेवण झाल्यावर मी तिला ते पत्र दिले. तिने ते लगेच वाचले आणि तिचे डोळे कुठेतरी दूर स्थिर झाले.

मग तिने मला विचारले, “ज्या माणसाने तुला हे पत्र दिले, त्याला पाहिलंस का?” मी म्हटल, “हो. तो साधारण साठीतला होता.”

नीताने विचारले, “जाडा की बारीक? उंच का बुटका? त्याने काय कपडे घातले होते....?”

तिला अडवत मी म्हटले, “ते मी पाहिले नाही.”

नीता म्हणाली, “माहीत आहे. तू फक्त मुलींकडे पहातोस.”

मग ती आईला विचारू लागली, “पत्रात काय लिहिले आहे?”

आई म्हणाली, “माझ्याशी लग्न करशील का? अस तो विचारतोय.”

नीताने तिच्यावर प्रश्नांचा भडिमार सुरू केला. "तुझी आणि त्याची कशी ओळख? तो श्रीमंत आहे का? तो दिसायला कसा आहे? राहतो कुठे? काय शिकलाय?"

तिला थांबवत आई म्हणाली, "तू माझी आई आहेस का मुलगी?"

मी म्हणालो, "नीता, शट अप!" आई हसली.

मग नीता म्हणाली, "आईच्या वयाच्या बायकांना कंपॅनियनची जरूरी असते."

आई म्हणाली, "तू वीस वर्षांची आहेस. माझ्या वयाच्या बायकांना कंपॅनियन लागतो हे तुला कसे कळले?"

मी विचारले, "मग आई, तू या पत्राला काय उत्तर देणार आहेस?"

आई म्हणाली, "नाही म्हणणार आहे."

"पण का?" नीताला तोंड बंद ठेवताच आले नाही.

"नीता, त्याला जी शालू हवी आहे, ज्या शालूच्या तो प्रेमात होता, ती मी नव्हे."

नीताने आणि मी एकमेकांकडे पाहिले आणि आम्ही दोघंही म्हणालो, "म्हणजे?"

आई म्हणाली, "नीता, चहा कर. तुम्हाला आता खर सांगायची वेळ आली आहे. तुम्ही मोठे झाले आहात."

चहा पिता पिता आई सांगू लागली, "माझे बाबा खेड्यात वाढले. त्यांच्या कुटुंबाची शेती होती. ते सर्वात धाकटे. ते हुषार होते. ते शिकून इंजीनियर झाले. मग मुंबईत स्थाईक झाले. त्यांचे भाऊ शेतीच काम बघत होते. मी लहानपणी दर उन्हाळा व दिवाळीच्या सुट्टीत खेड्यात आजोळी जात असे. खेड्यातले विचार सनातनी होते. पण लहानपणी मला त्याचा त्रास झाला नाही. मला मजाच यायची. आईला खेड्यात आवडायचे नाही. पण ती कांही बोलत नसे.

तिथे मला लक्ष्मण दिसायचा. त्याचे वडील व बाबा शाळामित्र होते. त्याच्या कुटुंबाची मोठ्ठी शेती होती. मी शाळेच्या शेवटच्या वर्षाला असतांना लक्ष्मणचे वडील लक्ष्मणला घेऊन आमच्या घरी आले. "लक्ष्मण कॉलेजला जायच म्हणतोय. तुमच्या जवळच्या कॉलेजला मी त्याला घालतोय. तो हॉस्टेलला राहील. पण त्याच्यावर लक्ष ठेवा." बाबांनी ती जबाबदारी घेतली.

मग लक्ष्मण आईने बोलावले की घरी येऊ लागला. दादाच्या आणि त्याच्या क्रिकेट, सिनेमाबद्दल गप्पा व्हायच्या. मी त्याच्याशी क्वचितच बोलायची. पुढच्या वर्षी मी कॉलेजात गेले. तिथे तो भेटायचा. एकदा त्याने "कॉफी घ्यायला येतेस का?" म्हणून विचारले. मी गेले. हळू हळू घसट वाढली. पण तो मर्यादा सांभाळून होता. मी कॉलेजच्या शेवटच्या वर्षाला असतांना बाबांनी स्थळ बघायला सुरुवात केली. लक्ष्मण तेव्हा शेतकी कॉलेजात होता. मी त्याला स्थळांबद्दल सांगितल्यावर तो काळजीत पडला.

"तुझ लग्न चटकन जमेल. मला काहीतरी करायला हव." तो म्हणाला.

"तुझ्या बाबांना मला मागणी घालायला सांग." मी सुचवल.

"त्यांना ते अपमानास्पद वाटेल. ते मला रागावतील." तो म्हणाला. मग तो बोलला, "पण मी तुझ्याशिवाय जगूच शकणार नाही."

दुसऱ्या दिवशी तो आमच्या घरी बाबांना भेटायला आला आणि त्याने मला मागणी घातली. बाबा आणि आईने ठाम नकार दिला.

"माझी मुलगी नाजुक आहे. ती तुमच्या घरातली मोठी सून होईल. तुमच्या घरातले कामाचे ओझे तिला पेलणार नाही." बाबा म्हणाले.

लक्ष्मण म्हणाला, "मी खेड्यात राहणार नाही. इथेच नोकरी बघीन."

बाबा म्हणाले, "तुला कसली नोकरी मिळणार आहे? घरचे लोक तुझ्यावर रागावतील. पैशासाठी तुला त्यांच्यावर अवलंबून राहता येणार नाही. तू शहरात राहिलास तर ते शालूला दोष देतील." मग ते म्हणाले, "तू घरचा खूप श्रीमंत आहेस. तुला खूप मुली सांगून येतील. तू शालूशी लग्न करण्याचा विचार मनातून काढून टाक." तो म्हणाला, "मला शालूशीच लग्न करायचय. नाही तर मी लग्नच करणार नाही."

आई आणि बाबा हसले. "तू तिला विसरशील." म्हणाले. मी रडले. हट्ट केला. 'खेड्यात राहीन' म्हटल. आई म्हणाली, "कापणी, पेरणीच्या वेळेला खूप कामकाऱ्यांना बोलावतात. त्यांना जेवण करून घालायची जबाबदारी घरातल्या बायकांवर पडते. सासरचे मला गांवी बोलवायचे. मी संबंध दिवस भाकऱ्या थापल्या आहेत. कंबर मोडून जायची. हे खूळ तू डोक्यातून काढून टाक."

दुसऱ्या दिवशी मला कॉलेजात एका मुलीने एक चिठ्ठी आणून दिली. 'आपण पळून जाऊन लग्न करू' अस लक्ष्मणने सुचवल होत.

नीता म्हणाली, "म्हणजे elope? How Romantic!"

आई म्हणाली, "हो. पण तेवढा धीर मला झाला नाही. त्याच वेळी तुमचे बाबा अमेरिकेतून लग्न करण्यासाठी भारतात आले होते. त्यांच्या आई-वडिलांनी व त्यांनी मला एका विवाह समारंभात पाहिले होते. त्यांना मी पसंत होते. त्यांनी चक्क मला मागणी घातली. बाबांनी माझ लग्न ठरवल आणि दोन आठवड्यात झालही! 'माहेरी राहून मी शिक्षण पूर्ण करणार' एवढी अट मी घातली. ती सासरच्या माणसांनी मान्य केली.

मी कॉलेजात जाऊ लागले. लक्ष्मणला विसरायचा प्रयत्न करत होते. लग्नाला त्याचे आई-वडील आले होते, पण तो आला नव्हता. कॉलेजात व नंतरही तो मला भेटलाच नाही. मग मी भारताला परत जात असे तेव्हा गौरीताई मला त्याच्याविषयी सांगत असे. कॉलेज संपवून त्याने मुंबईला त्यांच्या शेतीवरची फळे विकण्याचा धंदा सुरू केला. मग इतरांचाही माल तो विकू लागला. तो खूप श्रीमंत झाला. तो गांवात येऊन जाऊन असायचा. मुख्य: म्हणजे" आई थांबली, "त्याने लग्न केलंच नाही."

"खरंच!" नीता म्हणाली, "आई तुझ्यावर त्याच खरं खरं प्रेम होत. माझ्यावर कुणी अस प्रेम करेल का?"

आई म्हणाली, "मग मी अमेरिकेला आले, तेव्हा मला कॉलेजात आणखी शिकायचे होते. पण तुमचे बाबा म्हणाले, "तू आधी ड्रायव्हिंग शीक. आपल्याला घर घ्यायचय. मला कस घर हंव ते मी तुला सांगतो. तू रियल इस्टेटच्या बाईबरोबर खूप घरं पहा. त्यातली तीन निवड. त्यातल कुठल घ्यायच ते मी ठरवीन. अंतीम निर्णय माझा."

"हेच आमच्या जीवनाचे सूत्र बनले. अंतीम निर्णय बाबांचा असायचा. मी कॉलेजला गेलेच नाही. राहुल झाला. मग पांच वर्षांनी नीता झाली. ती शाळेत जाऊ लागल्यावर बाबांनी मला लायब्ररीत नोकरी करण्याची परवानगी दिली.

अंतीम निर्णय बाबांचा हयाबद्दल माझी तक्रार नव्हती. ज्या परंपरा, संस्कृतीत आम्ही जन्मलो, वाढलो त्या संस्कृतीच्या शिकवणुकीनुसार ते वागत होते. ते मला मान्य होते. मी अठ्ठावन्न वर्षांची होईपर्यंत प्रथम माझ्या वडिलांच्या, नंतर नवऱ्याच्या ईल्छेनुसार वागत होते. त्यांच्या तालावर नाचत होते. उरलेल आयुष्य मला माझ्या तालावर नाचायच आहे.

लक्ष्मण तुमच्या बाबांपेक्षा वेगळा असणार नाही. लायब्ररीत नोकरी करायला लागल्यावर मी बरीच पुस्तके वाचली. स्त्री मुक्तीबद्दल बरेच कांही शिकले. पण ते माझ्यासाठी नाही, असे म्हणून मी ते विचार मनातून काढून टाकायची. अकस्मात मला त्या विचारांनुसार जगायची संधी, ती मला नको असतांना मिळाली आहे. आता परत फिरण शक्य नाही.

मी लक्ष्मणला लिहीन, 'तू ज्या शालूवर प्रेम करत होतास, ती मी नव्हे. मी बदलले आहे. तू कुणीतरी भारतातली तुला आवडेल अशी मुलगी शोधून तिच्याशी लग्न कर. तुझी, तुला कॉलेजात भेटलेली शालू, ज्या शालूच्या प्रेमात तू होतास ती शालू आता इतिहासजमा झाली आहे.' बाबा ज्या मुशीतून निघाले, जे सनातनी संस्कार त्यांच्यावर झाले, तेच लक्ष्मणवर झालेत. मी त्याच्याशी लग्न केल, तर सगळे अंतीम निर्णय तोच घेईल. ह्यापुढे माझे अंतीम निर्णय मलाच घ्यायचे आहेत." ती हसली आणि म्हणाली, "शिवाय माझी दोन पिल्लं इथे आहेत."

आम्ही ह्या अनोळखी आईकडे बघतच राहिलो!

**लेखिका - ललिता गंडभीर**
lalitagandbhir@hotmail.com

# साहित्याचे माणिकमोती

## अमेरिकेचे नागरिकत्व - एक अनुभव

नुकतेच आम्ही अमेरिकेचे नागरिक झालो हा संपूर्ण अनुभव खूप छान होता. चला, तुम्हाला माझा अनुभव सांगतो. 😊

ग्रीनकार्ड मिळाल्यावर पाच वर्षांनी तुम्ही अमेरिकेचे नागरिक होण्यासाठी पात्र होता, हे बहुतेकांना माहीत असेल, पण एक गोष्ट लक्षात घ्यावी लागेल. पाच वर्ष तुम्ही US मध्ये असला पाहिजे. ह्याचा दुसरा अर्थ, समजा तुम्हाला ग्रीनकार्ड मिळून पाच वर्ष झाली आहेत, पण त्या पाच वर्षात तुम्ही एकूण सहा महीने भारतात किंवा US बाहेर कुठेतरी गेला असाल, तर ते सहा महीने तुम्हाला वगळावे लागतील. म्हणजे तुम्हाला अजून सहा महीने थांबावे लागेल. जर त्या सहा महिन्यात परत एक महिना तुम्ही भारतात गेलात तर अजून एक महिना जास्त. एकूण पाच वर्ष तुम्ही US मध्ये असला पाहिजे. अर्थात, हे मी माझ्या माहितीप्रमाणे लिहितो आहे. तुम्ही नक्की खातरजमा करून घ्या. कारण कायदे बदललेले असूच शकतात.

एकदा तुम्ही पात्र झालात, की मग तुमच्याकडे दोन पर्याय आहेत, एक तर एखाद्या वकिलाला तुमची केस देऊ शकता, किंवा तुम्ही स्वतः USCIS च्या साईटवर ऑनलाइन फॉर्म भरून स्वतः अर्ज करू शकता. तुम्हाला N-400 फॉर्म भरायचा असतो. जर वकिलातर्फे तुम्ही अर्ज करत असाल तर तुम्हाला अजून एक G-28 फॉर्म देखील भरावा लागतो, वकिलाला वकीलपत्र देण्यासाठी.

N-400 फॉर्म साठी तुम्हाला तुमची स्वतःची गेल्या पाच वर्षांची माहिती, जसे तुमचे गेल्या पाच वर्षांमधील सर्व पत्ते, तुम्ही केलेल्या सर्व परदेश वाऱ्या, तुमच्या सर्व नोकऱ्या / शिक्षण वगैरे माहिती लागते. ही सगळी माहिती आधीच तयार ठेवा म्हणजे मग फॉर्म आरामात भरता येईल. फॉर्म भरून झाला की त्याची प्रिंट काढून, त्यावर नुकताच काढलेला फोटो लावावा लागतो आणि स्वतःची सही करावी लागते. मग तो फॉर्म, इतर कागदपत्र आणि फी च्या चेक्स बरोबर USCIS च्या पत्त्यावर पाठवावा लागतो. फी साठी दोन वेगळे चेक्स लागतात – biometric आणि सिटिजनशिप साठी.

त्यानंतर काही काळाने तुम्हाला USCIS कडून biometric साठी अपॉईंटमेंट लेटर येईल. क्वचित काही प्रसंगी USCIS Biometricसाठी बोलवतही नाहीत. अपॉईंटमेंट ही तुमच्या जवळील USCIS ऑफिसमध्ये असते. शक्यतो USCIS ची अपॉईंटमेंट तुम्ही बदलू नका. तुम्ही तशी विनंती केली तर USCIS ऑफिस तुमची अपॉईंटमेंट रद्द करते आणि मग तुमची केस परत त्यांच्या पूल मध्ये जाते. पुढील तारीख कधी मिळेल ह्याची काही शाश्वती नसते. तेव्हा मिळालेली अपॉईंटमेंट शक्यतो तशीच ठेऊन वेळेवर जाऊन ती पाळा.

एकदा biometric अपॉईंटमेंट झाली की तुम्हाला शेवटच्या मुलाखतीची वाट बघायची असते. त्या काळात तुम्हाला अभ्यास करावा लागतो. USCIS च्या साईटवर परीक्षेचे प्रश्न दिलेले आहेत. एकूण १०० प्रश्न असतात. ह्यामध्ये अमेरिकेचे सरकार (American Government), अमेरिकेचा इतिहास, Integrated Civics बद्दल प्रश्न असतात. तुम्हाला ते सगळे प्रश्न आणि उत्तरे तोंडपाठ करावे लागतात. मुलाखतीमध्ये ह्या १०० पैकी ते कुठलेही १० प्रश्न विचारू शकतात. त्यातील किमान ६ प्रश्नांची तुम्हाला बरोबर उत्तरे द्यावी लागतात. आम्हाला पहिल्या सहा बरोबर उत्तरांनंतर पुढील प्रश्न विचारलेच नाहीत 😊

एकदा तुम्हाला इंटरव्ह्यु अपॉईंटमेंट लेटर आले की त्या दिवशी किमान अर्धातास आधी अपॉईंटमेंट लेटर आणि तुमचे ग्रीनकार्ड घेऊन पोहोचा. तुमचे अजून एक ओळखपत्र म्हणून ड्रायव्हींग लायसेंस बरोबर असणे गरजेचे आहे.

प्रथम तुम्हाला तुमचे लेटर बघून चेक-इन केले जाते. मग वेटिंग रूम मध्ये वाट बघावी लागते. ऑफिसर येऊन तुम्हाला बोलावतो तेव्हा आठवणीने त्यांना गुड मॉर्निंग किंवा गुड आफ्टरनून वगैरे विश करा. मुलाखत घेतांना मध्ये ऑफिसर computer वर तुमची माहिती बघत असतो आणि मध्ये मध्ये ती माहिती बरोबर आहे हे बघण्यासाठी तुम्हाला प्रश्न विचारून खात्री करून घेतो. त्यानंतर तुम्हाला १०० प्रश्नांपैकी कुठलेही random प्रश्न विचारण्यात येतील. उत्तर देताना अगदी आठवणीने त्याचे/तिचे नाव घेऊन 'ऑफिसर XXX' असे संबोधून मग उत्तर द्यावे. तसे न केल्यास कदाचित उत्तर बरोबर असूनसुद्धा ते गृहीत धरणार नाही.

एकदा तुम्ही मुलाखत पास झालात की मग तुम्हाला २-३ अगदी सोप्पी इंग्लिश वाक्ये  वाचायला सांगण्यात येईल. आपल्यासाठी ते खरच खूप सोप्पं असते, त्याची काळजी करायची काहीही गरज नाही 😊 त्यानंतर असेच ४-५ शब्दांचे एक अतिशय सोपे वाक्य लिहायला सांगण्यात येते. तेही अत्यंत सोपे असते, काळजी नसावी 😊 हे एकदा झाले की ऑफिसर तुम्हाला सांगतो की तुम्ही पास झाला आहात.

त्या पुढील पायरी म्हणजे शपथ घेणे. पूर्वी साधारणपणे तुम्हाला घरी जायला सांगायचे आणि मग शपथविधीसाठी परत वेगळी अपॉईंटमेंट द्यायचे, पण सध्या इंटरव्ह्यु पास झाल्यावर लगेचच तोच/तीच ऑफिसर तुम्हाला तिथेच उजवा हात वर करून उभे राहण्यास सांगतो आणि तुम्हाला शपथ देतो. त्या नंतर थोड्याच वेळात तुमच्याकडून तुमचे ग्रीनकार्ड काढून घेण्यात येते आणि तुम्हाला तुमच्या नावाचे Naturalization Certificate सर्टिफिकेट मिळते. त्यावर तुम्हाला सही करायची असते. एकदा ते झाले की तुम्ही ह्या देशाचे नागरिक झालात 😊

पुढील पायरी म्हणजे ते ओरिजनल सर्टिफिकेट, त्याची एक कॉपी, तुमच्या ड्रायव्हींग लायसेंसची पुढील आणि मागील भागाची एक कॉपी आणि संपूर्ण भरलेला फॉर्म घेऊन तुम्ही जवळील पोस्ट ऑफिस मध्ये जाऊन तुमच्यासाठी US चा पासपोर्ट अर्ज करायचा. 😊

**लेखक - अमित नगरकर**
nagarkaramit@gmail.com

# साहित्याचे माणिकमोती

## लाजरी

लाजली जराशी तू वळुन
भान मी सारे हरलो ग !

रुजले बीज हृदयी माझ्या
अंकुर सुंदर जगले ग !

क्षण ते जगलो क्षण ते रुजलो
प्रेमात तुझ्या मी पडलो ग !

तहान भूक सारे विसरलो
मी माझा ना आता उरलो ग !

सौंदर्य साचले लोचनी अन
हृदयी वसंत फुलला ग !

पालवी फुलता भावनेस माझ्या
मेघ आकाशी मग भरले ग !

गंध पसरला पावसाचा अन
इंद्रधनुही खुलले ग !

कोमल नाजुक तुझ्या पाउली
वाजे पैंजण छम छम ग !

भाळलो मी असा तुझ्या रुपावर
शब्द निशब्द झाले ग!

मागतो मी एक मागणे
तार हृदयी जुळती ग!

सुख दुःखांची नाळ जोडूनी
देशील अर्थ या जगण्या ग!

लाजली जराशी तू वळुन पाहता
भान मी सारे हरलो ग!!
भान मी सारे हरलो ग!!

**लेखक - लाभेश शेवलकर**
labhesh.shewalkar@gmail.com

# साहित्याचे माणिकमोती

## बृहन महाराष्ट्र संमेलन, २०२४




नुकतेच म्हणजे जून २७ ते जून ३०, २०२४ ला सॅन होजे, कॅलिफोर्निया इथे बृहन महाराष्ट्र मंडळाचे २१वे अधिवेशन झाले. ह्या आधी मी २००५ साली झालेल्या अॅटलांटाच्या अधिवेशनाला गेले होते. तेव्हापेक्षा आता आणखी नवीन, तांत्रिक परस्पर दळणवळण आणि संपर्काच्या सोयी उपलब्ध आहेत. सांगून सवरून बे एरियाच तो! तिथे खूप काही गोष्टी एकदम मॉडर्न आणि technically advanced दिसल्या.

मी तशी I.T. क्षेत्राशी फारशी संबंधित नाही आणि आता थोडी मागच्या पिढीची सुद्धा झालेच आहे. त्यामुळे असेल कदाचित पण मला पहिली गोष्ट वेगळी जाणवली ती म्हणजे Whova app चा (Event Management App) अधिवेशनाच्या किती तरी दिवस आधीपासूनच वापर. खूपच सोय झाली त्यामुळे. मला मी ज्यांना तीस चाळीस वर्षांपूर्वी भेटले होते, अशा मैत्रिणीशी आधीपासूनच संवाद साधता आला. अधिवेशनात वैयक्तिक माहिती व्यतिरिक्त अन्य सामाजिक क्षेत्रांतही काय पाहायला ऐकायला मिळेल - ह्यात शॉपिंग ही आल बर का! हे सर्व Whova मुळे कळू लागल आणि अधिवेशनाच्या आधीच वातावरण निर्मिती झाली.

अधिवेशनात सर्वांनाच रोज येता येत नाही. ह्या वेळी एकच दिवस किंवा ठराविक कार्यक्रमांना येता येईल अशी तिकिटे देखील ठेवली होती. प्रत्येक लोकल मंडळाचे ब्लॉक बुकिंग हा प्रकार नवा होता. मला तो सोयीस्कर वाटला. काही मंडळी आपापल्या एरियाचे ग्रुप करून बसली. तर आमच्या सारख्या काहींनी जिथे आमचे कुटुंबातले लोक होते तिथून बुकिंग केल आणि तसे एकत्र बसलो.

BMM अधिवेशनाचे पुष्कळ रिपोर्ट्स आहेत. म्हणून मी अगदी बारीक सारिक तपशील न देता, इथे केवळ माझा वैयक्तिक अनुभव सांगते.

आपल्या घरात चार माणसे जमा झाली तरी कार्यात गोंधळ होतोच. तेव्हा थोडी काहीतरी गडबड होईल हे अपेक्षित होत. गुरुवारी अधिवेशनाच्या आधी सकाळी special interest चे कार्यक्रम असतात जसे की उद्योजक, विक्रेते मंडळींसाठी, शैक्षणिक, उत्तररंग वगैरे. खाश्या पाहुण्यांसाठी संध्याकाळी मनोरंजनाचा कार्यक्रम असतो. आयोजकांनी अधिवेशनाच्या थोडेच दिवसांआधी हा कार्यक्रम सर्वासाठी खुला केला. किती छान!

पण ऐनवेळी बदल झाला म्हणून की काय माहिती नाही, पण ह्या पहिल्या कार्यक्रमात गोंधळ झाला. काही प्रेक्षक donors च्या राखीव जागांवर बसले. चूक लक्षात आल्यावर आयोजकांनी स्टेजवरून विनंती केली की कृपा करून आपल्या निर्धारित जागांवर जाऊन बसा आणि कार्यक्रम पुन्हा सुरू झाला. ह्या कार्यक्रमाच्या संयोजकांनी जरी जाहिरातीत हिंदी-मराठी गीतांचा कार्यक्रम असे सांगितले असले  तरी मराठी लोकांचं संमेलन असल्याच भान ठेवायला हरकत नव्हती! सुरुवातच हिंदी गीतांनी झाली. त्यात मध्ये सीट्सचा गोंधळ! हे पुरेसे नव्हते म्हणून की काय  काही प्रेक्षक अजून donors च्या जागा सोडायला तयारच होईनात!

शेवटी अध्यक्ष महोदयांना मंचावर येऊन ह्या मंडळींना जरा तंबीच द्यावी लागली आणि सिक्युरिटीला बोलावून सर्व व्यवस्था लावावी लागली. डळमळीत सुरुवात झालेला हा कार्यक्रम लोकांनी 'मराठी म्हणा' अश्या आरोळ्यांनी पुन्हा एकदा चुकीच्या अर्थानी गाजवला. सर्वात लाजीरवाणी गोष्ट म्हणजे एका गाण्यावर लोक निषेध म्हणून का आनंदानी नाचत होते कळले नाही - तिथे एका व्यक्तीने हातात चपला घेतल्या. ती व्यक्ती स्टेजकडे जाऊ लागली आणि गायक मध्येच थांबला आणि म्हणाला, "आता तुम्ही हे करणार आहात?". कार्यक्रमाची रूपरेषा न आवडून थोडा निषेध करणे ( खर तर तेही बरोबर आहे का? नसेल आवडला तर उठून निघून जा) ठीक. पण कलाकारांचा असा अपमान करणे अत्यंत चुकीचं आहे. ह्या नंतर आम्हाला (ग्रुप मधल्या) कोणालाच रस न राहिल्याने आम्ही रूमवर परतलो.

सुरुवात अशी तर आता पुढे काय होणार अशी थोडी धास्ती वाटली. पण ह्या गालबोटा नंतर मात्र सगळे कार्यक्रम उत्तम झाले आणि आम्ही तरी ते एन्जॉय केले. एक मात्र जाणवले - ह्यानंतर जवळ जवळ सर्वांनी आपण हिंदी, मराठी, इंग्लिश ह्यापैकी कोणती ही भाषा वापरू अस वक्तव्य कुठे ना कुठे केलच. अगदी गुरू गोपळदासांनी सुद्धा.

प्रत्येक वेळी BMM मध्ये अनेक ठिकाणी कार्यक्रम एकाच वेळी प्रस्तुत होत असतात. आपल्याला दोन किंवा तीन प्रयोग एकाच वेळी पाहता येत नाहीत. सर्वांनाच ह्याची खंत वाटते. प्रयोगांची एवढी भाऊगर्दी न करता, सर्व कार्यक्रम दोन वेगळ्या दिवशी वा वेगळ्या वेळी प्रस्तुत का नाही करत? आपल्या ढोल ताशा पथकाला cheer करायला तर जायलाच हव, पण मग मुक्ता बर्वेच कविता वाचन होईल तेव्हा चांगली जागा नाही मिळणार, मग काय करणार? जाऊ दे, कुठेतरी बसू मुक्ता बर्वे आणि सह कलाकारांचा प्रयोग बघायला. अशाच भाऊगर्दीत मला एकही नाटकाचा प्रयोग बघता आला नाही. संगीत ययाती देवयानी थोड दारात उभ राहून बघता आल. छान होत.



'AI करेल ना बे' हा वेगळाच कार्यक्रम बघितला. विविध क्षेत्रातली मंडळी AI चा आपापल्या क्षेत्रात कसा उपयोग करतायत ते बघून AI ची भीती थोडी कमी झाली. ह्या क्षेत्रात regulation येणं आणि ते समंजस आणि डोळसपणे (आणि लौकरात लौकर) येणं अत्यावश्यक आहे.

संगीत हा माझा आवडता प्रांत आहे. सर्वच संगीत प्रयोग छान होते. अजय अतुल हे बंधू सद्या खूप लोकप्रिय आहेत. माझी त्यांच्या कार्यक्रमाबद्दल फारशी अपेक्षा नव्हती - खूप लाऊड असेल - आधीचा सा रे ग म चा धसका वगैरे मुळे तस वाटत होत. प्रत्यक्षात मात्र तो खूपच रंगला आणि माझ्यासकट शेकडो प्रेक्षक अगदी आनंदानी उड्या मारताना (नाचताना) बघितले. मजा आली. आम्ही खूप दूरवरून तुमच्यासाठी खूप मेहनत करून आलोय, त्यामुळे जास्तीत जास्त गाणार, अन्य बडबड करणारच नाही, असे सांगून त्यांनी सुरुवातीलाच प्रेक्षकांना खिशात टाकले.

आणखी एक उत्कृष्ट संगीताचा कार्यक्रम पंडित संजीव अभ्यंकर आणि विदुषी अश्विनी देशपांडे - भिडे ह्यांचा 'जसरंगी'. ही स्व. पंडित जसराज यांच्या संकल्पने नुसार सादर केलेली जुगलबंदी. किती सुंदर, किती वर्णन करू? अवीट.




शेवटच्या दिवशी चक्क क्रिकेट मॅचच्या शेवटच्या ओवर्स मोठ्या टीव्ही वर बघून भारताच्या विजयाचा जल्लोष आणि त्या नंतर माझे तसेच अनेकांचे अत्यंत प्रिय खेळाडू सुनील गावसकर ह्यांचा सन्मान व त्या नंतरची मुलाखत - मझा आ गया! अमेरिकेचा मराठी क्रिकेटर सौरभ नेत्रवलकर आणि त्याचे coach ह्यांचाही सत्कार झाला. शेवटी लोकप्रिय कलाकार महेश काळे ह्यांचा अभंग वारी हा कार्यक्रम मात्र चुकला. तो ही खूप रंगला असे कळले.

आता दुसऱ्या प्रिय विषयाकडे वळते. भोजन. अप्रतिम आयोजन. आपल्याला चार माणस घरी जेवायला बोलावली की तारांबळ उडते. इथे तर तीन ते पाच हजार लोकांना breakfast, lunch, dinner त्यात काही लोकांच्या स्पेशल needs, सर्वच लक्षात घेऊन किती सोयीस्कर आणि रुचकर अनुभव? वाह!




ज्या त्या दिवशी आयोजकांनी पोशाख सुचवले होते, लोक उत्साहानी त्यात भाग घेत होते. आयोजकांनी आणि उद्योजकांनी सर्व convention center आणि आजूबाजूला सुंदर सजावट केली होती. ठिकठिकाणी पू ल, मराठी स्त्री आणि पुरुष, तुळशी वृंदावन इत्यादी मोठे cutouts होते. लोक उत्साहाने तिथे फोटो काढत होते.

एकंदर चार दिवस मुंबई, पुणे, नागपूर वगैरे ला जाऊन आल्यासारखे आणि अगदी मंत्रमुग्ध गेले. सर्व आयोजक, donors आणि मुख्य म्हणजे volunteers ना सलाम!

**लेखिका - अरुणा पाटणकर**

patankars@bellsouth.net

# साहित्याचे माणिकमोती

## ताई

*कवितेचा संदर्भ:* आम्ही भारतात एका लग्नाला गेलो असतांना मी माझ्या बहिणीला भेटू शकले नाही. मी लग्नात मग्न होते. शिवाय कधी माझी लहान मुलगी आजारी तर कधी माझ्या बहिणीची मुलगी आजारी होती. ही कविता मी माझ्या भाचीच्या वाढदिवसाच्या निमित्ताने केली. माझी मुलगी तिच्या मोठ्या बहिणीला काय म्हणेल अशी कल्पना केली आहे.




**लेखिका - सोनाली क्षीरसागर शिंगण**
Sunshine.33472@gmail.com

# साहित्याचे माणिकमोती

## सूर्यास्त (चारोळी)




लेखिका - सोनाली क्षीरसागर शिंगण
Sunshine.33472@gmail.com

# Dal Dhokali

**Ingredients:**

**To Make Dal:**

- ½ Cup Toor dal/Split Pigeon Peas, rinsed and drained
- 2 Tbsp Oil(you can use ghee too)
- ½ Tsp Mustard seeds
- ½ Tsp Cumin seeds
- 1 Stick Cinnamon
- 3 Cloves
- 4-5 Dried Red chilies
- ¼ Tsp Asafetida/Hing
- 10-12 Curry leaves
- 3-4 Green Chilies
- 1 Tomato, chopped
- 1 Tsp Turmeric
- 1 Tsp Ginger, grated
- 1 Tomato, diced
- 1 Tbsp Red chili powder
- 1 Tsp Coriander Powder
- 1 Tsp Cumin Powder
- Salt to taste
- 1 Tbsp Jaggery
- 2 Tbsp Peanuts
- 4 cups water
- ¼ Cup Coriander leaves/cilantro, chopped for garnish

**To Make Dhokli:**

- 1½ Cups Whole Wheat flour
- 2 Tbsp Besan(Chickpea flour)
- 1 Tsp Turmeric
- 1 Tsp Kashmiri Red chili powder
- 1 Tsp Coriander Powder
- 1 Tsp Cumin Powder
- 1 Tsp Carom Seeds
- Salt to taste
- 1 Tbsp Oil
- 1 cup water or as needed

**Instructions:**

To Cook Dal in the Instant Pot:

- Turn on the sauté mode of the Instant Pot and heat 2 Tbsp of oil.
- Splutter cumin and mustard seeds, and add cinnamon stick, cloves, green chilies, dried red chilies, curry leaves, and mix well.
- Now add washed toor dal(Split Pigeon Peas), peanuts, tomatoes, red chili powder, turmeric, coriander-cumin powder, asafoetida, jaggery, and salt.
- Mix everything well.
- Add 2 cups of water, give it a quick stir, and close the lid of the Instant Pot.
- Place the valve in the sealing position.
- Pressure Cook on manual mode (Hi) for 5 minutes followed by Natural Pressure Release.

**To Make the Dhokli:**

- In a mixing bowl add whole wheat flour, besan, salt, carom seeds, red chili powder, turmeric, coriander-cumin powder, asafoetida, salt to taste, and 1 Tsp oil.
- Mix everything well.
- Use water as needed to make a firm yet pliable dough.
- Add oil and knead the dough well.
- Cover and keep aside for 5-10 minutes.
- Using flour, roll the dough balls into 10–12-inch thin circles.
- Using a knife, cut each rolled circle into 1-inch squares or dhoklis.
- Put the cut dough pieces on a plate.

**To Make Dal Dhokli:**

- Open the lid of the Instant Pot after the pressure has released naturally.
- Turn Instant pot to sauté mode.
- Using the back of a spatula or a masher, mash the dal.
- Add 2 cups of water, mix well, and bring the dal to a gentle boil.
- Add the dough squares to the dal and mix gently.
- Close the lid of the Instant Pot and place the pressure valve in the sealing position.
- Pressure Cook on Manual Mode (Hi) for 2 minutes followed by Quick Release.
- Mix the Daal Dhokli, add ghee 1-2 Tbsp (Optional).
- Lastly, garnish with chopped coriander leaves.
- Healthy and soothing Dal Dhokli is ready to serve.  Enjoy!

**Tips:**

- If needed add water and adjust the consistency of dal as required (The dal thickens once cooled).
- You can cut the dhokli in diamond or square shapes.
- Adding jaggery will enhance the flavor of dal, so don't skip adding it.
- To make dal dhokli healthier you can add veggies like spinach, carrots, peas, beans, etc
- To make dal dhokli healthier you can add veggies like spinach, carrots, peas, beans, etc




शेफ डॉ. शुभांगी कुंभार
drshubhi9@gmail.com
Owner at Niask Tasty Treats
Youtube: Aaichi Savali

# खाना खजाना

## Khajur Modak

These small, energy-boosting Modaks are a good source of vitamins and minerals. Dates are a healthy substitute for white sugar in recipes due to their sweet taste, nutrients, fiber, and antioxidants. This chewy Modaks allows the sweetness of the dates to shine with very little extra sugar.

Preparation and Cooking Time: 15 Minutes. Each Khajur Modak Contains 60 Cal.

**Ingredients:**

Dates / Khajur 1 Cup (100 g) (Seeds removed)
Almond 2 Tbsp
Cashews 2 Tbsp
Pistachios 2 Tbsp
Raisins 1 Tbsp
Poppy seeds 1 Tbsp
Ghee 1 Tsp

**Instructions:**

1. Dry roast the nuts (almonds, pistachios, and cashews) for 3-4 minutes, or until fragrant (take care not to change its color, so roast on medium flame).
2. Dry roast poppy seeds for a minute on low flame and keep it aside.
3. Once cooled down, grind nuts with raisins coarsely (do not powder too much, there should be chunks of nuts).
4. In pan heat ghee, add chopped dates, and saute and cook on a medium flame for 3-4 minutes or until dates become soft.
5. Once done let the dates cool down before mixing with nuts.
6. Mix both the dates and nuts and form a dough.
7. Divide the dough into equal parts.
8. Grease the modak mold with the ghee and fill it with the dates-nuts mixture.
9. Demold carefully arranges it on the plate (grease the mold with ghee every time).
10. Dip and roll the lower half of the prepared modak into the roasted poppy seeds, which will look beautiful and add slight crunch to the Modak.
11. Healthy and yummy Ganpati Bappa's Favorite Khajur/Khajoor Modaks are ready to serve. Enjoy!!!

**My Take:**

- You can add roasted desiccated coconut too along with nuts.
- You can add nuts of your choice, but add in small portions, some nuts may give a bitter taste to the modaks.
- You can reserve some powdered nuts and sprinkle over the modaks instead of poppy seeds. This will look nice as well as make the modak non-sticky.
- You can use pistachio powder to sprinkle over the modak for a pleasant color.
- You can roll the whole Modak into the poppy seeds if you like.




शेफ डॉ. शुभांगी कुंभार
drshubhi9@gmail.com
Owner at Niask Tasty Treats
Youtube: Aaichi Savali

# सिनिअर्स कॉर्नर

## माझी कृष्णभक्ति

|| ओम नमो भगवते वासुदेवाय ||

मला नक्की आठवत नाही मी किती वर्षाचा होतो. पण खूप लहान असताना कधीतरी आई मला घेऊन बदलापूरला गेली, तेव्हा सर्वप्रथम मला श्रीकृष्णाच्या मूर्तीचे दर्शन झाले आणि ताईंशी ओळख झाली. त्यानंतर आजपर्यंतच्या आयुष्यात 'ओम नमो भगवते वासुदेवाय' चा सततचा जप आणि श्रीकृष्णाच्या साक्षीने प्रत्येक गोष्ट करणे हा नित्यनेम झाला आहे. श्रीकृष्ण सतत आपल्या बरोबर आहे ह्याची प्रचिती पदोपदी येतच रहाते. त्यातीलच एक किस्सा सांगतो.

मी भारतात नोकरीला होतो. त्या कंपनीने ठरविले की ऑफिसमधील दोघांना अमेरिकेला पाठवायचे आणि बघायचे की अमेरिकेत आमच्या आमच्या योग्य काम आहे का आणि असेल तर अजून लोकांना पाठवायचे. ह्या पहिल्या दोन जणांमध्ये श्रीकृष्णाच्या कृपेने माझा नंबर लागला आणि त्याच्याच कृपेने लगेच व्हिसा सुद्धा मिळाला. तोपर्यंत मी कधीच माझ्या परिवारपासून दूर राहिलो नव्हतो. आता एकदम सातासमुद्रापार आणि तेही भविष्याविषयी काहीही ठोस प्लॅनिंग नसतांना. निर्णय अतिशय कठीण होता. पण करियरकडे लक्ष द्यायचे असेल आणि थोडे दिवसात जास्त पैसे कमवायचे असतील, तर हृदयावर दगड ठेऊन जाणे भाग होते. श्रीकृष्णावर भरवसा ठेवून, केवळ त्याच्याच आधाराने परिवाराला सोडून मी अमेरिकेच्या विमानात पाऊल ठेवले. तेव्हा माझ्या दोन्ही लहान मुलांच्या आठवणीने अश्रु आवरणे कठीण झाले होते.

अमेरिकेच्या भूमीवर पाय ठेवला तेव्हा इथे वेगळीच परिस्थिति आ वासून उभी होती.

भारतातील कंपनीने विस्तारासाठी हा प्लॅन केला असला तरी आमची अमेरिकेतील जबाबदारी कंपंनीच्या अमेरिकन ऑफिसवर सोडली होती. अमेरिकेतील ऑफिसमधील लोकांना मात्र हे नको होते. जर आम्हाला यश मिळाले, तर भारतातून अजून लोक आले असते आणि अमेरिकन ऑफिसचे काम वाढले असते. ते टाळण्यासाठी त्यांनी ठरवले की आम्हाला मदत करायची नाही आणि इथे काही आमच्यायोग्य काम नाही असे दाखवून आम्हाला परत पाठवायचे.

ह्या त्यांच्या प्लॅनमुळे आम्हाला विमानतळावर घ्यायला कुणीही आले नाही. आम्हीच टॅक्सी करून बुक केलेल्या हॉटेलवर पोहोचलो. दुसऱ्या दिवशी कंपंनीच्या एकाने फक्त एकदा भेट घेऊन काही जुजबी गोष्टी सांगितल्या, एक मोबाईल देऊन जास्त न वापरण्याबद्दल बजावले आणि तो निघून गेला.

त्यानंतर हॉटेलच्या त्या रूममध्ये माझा एकांतवास सुरू झाला. तेव्हा ना माझ्याकडे लॅपटॉप होता ना भारतात फोन करून कुणाशी बोलता येत होते. न करायला काही काम होते ना खायला काही ठीकठाक. चालत

जाण्याच्या अंतरावर काहीही नव्हते. हॉटेलच्या बाहेरच मोठा हायवे असल्याने त्यावर चालण्याची परवानगी नव्हती. टॅक्सीने कुठेही जाण्यासाठी पैसे नव्हते. माझ्याबरोबर आलेला सहकारी त्याच्या ओळखीने कुठेतरी निघून गेला. त्यामुळे बोलण्याचा तो मार्गसुद्धा खुंटला. अमेरिकेत येतांना खांद्यावर लोकांच्या अपेक्षांचे आणि डोक्यावर कर्जाचे ओझे घेऊन आलो होतो. त्यामुळे हार मानून परत जाणे म्हणजे नामुष्कीची गोष्ट होती.

माझा कॉलेजचा एक मित्र अमेरिकेत स्थायिक झाला होता. नाही म्हणायला त्याच्याशी कधीतरी अगदी थोडे बोलणे व्हायचे, पण तेही अत्यंत त्रोटक. 'खाली दिमाग शैतान का घर होता है' आणि 'मन चिंती ते वैरी ना चिंती' ह्या उक्तिनुसार मनात अतिशय वाईट विचार यायला लागले होते. भविष्य अंध:कारमय दिसत होते आणि करण्यासारखे हातात काहीही नव्हते. मदतीला कुणीही नव्हते. बोलायला कुणीही नव्हते. परिस्थिती बिकट होत चालली होती आणि कुठलाही मार्ग दिसत नव्हता.

शेवटी एके संध्याकाळी ह्या सगळ्याचा कडेलोट झाला आणि माझे नैराश्य मला आत्मघातकी विचारांपर्यंत घेऊन गेले. अतिशय प्रबळ असे निराशाजनक विचार मनात यायला लागले. स्वतःला सावरण्याचा विचार करत मी बेडवर पडलो होतो आणि हृदयाच्या खोल कप्प्यातून कृष्णाचा धावा करत होतो. त्या नैराश्येतून बाहेर काढण्याबद्दल त्याला विनवीत होतो. आत्मघातकी विचारांच्या हिंदोळ्यांचा वेग प्रचंड वाढला आणि एका क्षणी मी बेडवरून उठलो. मनापासून कृष्णाचा धावा करतानाच नकारात्मक विचार कृतीत कसे आणावे ह्याचा विचार करत होतो. तो एक क्षण होता, मला मिळालेला कुठलाही मार्ग मी अनुसरला असता.

आणि त्याच क्षणी माझा मोबाईल वाजला. त्रासून बघितले तर माझ्या कॉलेजमधल्या अमेरिकेतल्या मित्राचा फोन. माझ्याही नकळत मी फोन उचलला. आम्ही बोलायला सुरवात केली. नेहेमी घाईत असणारा तो आज चक्क फुरसतीत होता. त्याने माझी विचारपूस करताच माझा बांध फुटला. मनात आलेले इतके दिवस साचलेले सगळे सगळे मी ओकून टाकले. मन मोकळे केल्यावर मला थोडे बरे वाटले. मी थोडा शांत झाल्यावर त्याने बोलायला सुरवात केली. त्याने मला समजावले, त्याने मला झापले, माझ्या निराशाजनक आत्मघातकी विचारांसाठी त्याने चक्क मला शिव्याही दिल्या. पण त्याच्या हक्काने, माझ्या काळजीपोटी दिलेल्या शिव्या मला ओव्यांसारख्या वाटत होत्या. मग त्याने मला धीर दिला आणि अमेरिकेतील कायद्यांबद्दल माहिती दिली. माझी कंपनी कशी काही गोष्टींसाठी बांधील आहे आणि मनात आणले तर मीच कसे कंपनीला माझ्या तालावर नाचवू शकतो वगैरे समजावून सांगितले.

जवळजवळ तासभर आम्ही बोलत होतो आणि तो क्षण आला की माझ्या मनातील नैराश्याची सारी जळमटे साफ झाली आणि मन आत्मविश्वासाने दुथडी भरून वाहू लागले. माझ्यातील हा बदल जाणवल्यावर आणि आता मला काही धोका नाही हे नक्की झाल्यावर त्याने एक दीर्घ निश्वास टाकला आणि आमची गाडी इतर विषयांकडे वळली.

मी सहज त्याला विचारले की तू आत्ता कसा काय फोन केलास? त्याने सांगितले की त्याच्या मोबाईलवर त्याने माझा व्हॉईस मेसेज ऐकला, म्हणून लगेच फोन केला. मी त्याला बोललो की गेल्या दोन दिवसात मी त्याला

फोन केलाच नव्हता आणि दोन दिवसापूर्वी मी त्याला व्हॉईस मेसेज सोडला होता. तो हे मानायलाच तयार होईना. कारण अगदी एक तासापूर्वी आलेला व्हॉइसमेल त्याने ऐकला होता आणि तेव्हा त्याला माझा हा मेसेज कुठेच दिसला नव्हता.

त्याच्या तोंडून हे ऐकले आणि माझ्या डोळ्यांना पाण्याच्या धारा लागल्या. माझा कंठ दाटून आला. मी कसाबसा त्याचा कॉल संपवला, फोन ठेवला आणि श्रीकृष्णाचा फोटो काढून त्यासमोर माझ्या अश्रूंना मुक्तपणे वाट मोकळी करून दिली. आत्ता हा चमत्कार दाखवून श्रीकृष्णाने माझे प्राण वाचवले होते. त्याच्या भक्ताने मनापासून मारलेल्या हाकेला तो तितक्याच तत्परतेने धावून आला. ह्या कलियुगातदेखील त्याचे चमत्कार त्याच्या भक्तांसाठी चालूच असतात, ह्याची अजून प्रचिती ती काय हवी?

आजही मला तो प्रसंग आठवतो, तेव्हा माझी तेव्हाची अवस्था आठवून भीती वाटते आणि श्रीकृष्णाचा चमत्काररूपी आशीर्वाद आठवून मन भरून येते. नक्कीच माझे पूर्वसंचित असणार ज्यामुळे मला ही श्रीकृष्ण भक्तीची ओढ लागली आणि श्रीकृष्णाच्या आशीर्वादाची छत्रछाया लाभली.

|| ओम नमो भगवते वासुदेवाय ||

**लेखक - अमित नगरकर**
nagarkaramit@gmail.com

# प्रश्नमंजुषा

## नाट्य दर्पण *(प्रश्नमंजुषेची उत्तरे पुढील दर्पण सदरात दिली जातील)*

*रिकाम्या जागा भरा आणि नाटकाचे नाव सांगा. उदाहरणार्थ: सं_त सौं_ _ _ _ळ = संगीत सौंशयकल्लोळ*

१. सी_ स्व_व_

२. तो _ न_च

३. सं_त _ _द्र

४. कु_म _ _ह_ _ले

५. मी _ _ _म _ _से_ _तो_

६. ती _ _ _णी

७. क_ _ _ _ _त _ _ली

८. स_ _ _ बा_ _ _

९. स_ता _ _दर _ _ _पे

१०. जाण_ _जा

११. शा_त_

१२. म_गंधा

१३. स_स्त_ _ग

१४. किच_ _ध

१५. सं_ _ मा_ _ _न

१६. टू_टू_

१८. मो_ची _व_

१९. ए_च _ला

२०. म_ना_ _ _री

२१. शां_ता! _ _ _ _ आहे

२२. ले_ _ _दं_ _ली

२३. ऑ_ द _स्ट

२४. न_ _म्रा_

२५. सा_खं का_ _री हो_ _

२६. चा_ _ _स प्रे_ _

२७. गे_ मा_व कु_ _डे

२८. सा_ _ _ल्ले_ मा_स

२९. सू_ _ _ल्ले

३०. वस्त्र_ _ण

३१. न_ _त _रे घ_ले

३२. को_ म्ह_तं ट_ दिला?

३३. जर _ _ _ गोष्ट

३४. नि_ _ व _टी _गू

३५. अ_ _ फोटो _ _ _

३६. का_ रा_

३७. द पर_ _ म_ _

३८. चा_चौ_

३९. यू म_ डा_

४०. दी_ _भ

**लेखिका - रसिका जोशी**

rasika_j@hotmail.com

# उत्तर सांगा पाहू?

## जय जय महाराष्ट्र माझा (उत्तरे)

1. महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री कोण? - **यशवंतराव चव्हाण**
2. जगातील पहिली शिक्षणसंस्था जिथे संरक्षणाच्या तिन्ही (आर्मी, नेव्ही, आणि एअरफोर्स) शाखांचे प्रशिक्षण दिले जाते. - **नॅशनल डिफेन्स अकादमी (The NDA) खडकवासला, पुणे**
3. नोव्हेंबर महिन्यात नागपूरमध्ये कोणता महोत्सव साजरा केला जातो? - **कालिदास**
4. छत्रपती शिवाजी महाराजांचे “अध्यात्मिक गुरू” कोण? - **रामदास स्वामी**
5. महाराष्टातील सर्वात मोठा जिल्हा कोणता? - **अहमदनगर किंवा अहिल्यानगर**
6. ‘जय जय महाराष्ट्र माझा’ हे गीत कोणी लिहीले आहे? - **राजा बढे**
7. साताऱ्या जवळील एक पठार, ज्याचा २०१२ साली युनेस्को जागतिक वारसा स्थळांच्या संरक्षित यादीत समावेश केला गेला आहे. - **कासचे पठार**
8. महाराष्ट्रातील उत्तुंग शिखर कोणते आणि ते समुद्रसपाटीपासून किती उंचीवर आहे? - **कळसूबाई ५४०० फूट उंचीवर**
9. शिवाजी महाराजांचा जन्म कोणत्या गडावर झाला? - **शिवनेरी**
10. महाराष्ट्रात किती जिल्हे आहेत? - **३६**
11. महाराष्ट्रातील सर्वात लांब नदी कोणती? - **गोदावरी नदी**
12. ‘सुधारक’ वर्तमानपत्र कोणी चालू केले आणि केसरीचे पहिले संपादक कोण? - **गोपाळ गणेश आगरकर**
13. कोयना आणि कृष्णा नद्यांचा संगम कोणत्या शहराजवळ झाला आहे? - **कराड**
14. "गुळाचा गणपती" ह्या चित्रपटाची कथा आणि पटकथा कोणी लिहीली आहे? - **पु. ल. देशपांडे**
15. शारदा सदन शाळा कोणी सुरु केली? - **पंडीता रमाबाई**
16. मराठी भाषा गौरव दिन कधी आणि कोणाच्या जन्मदिवशी साजरा करण्यात येतो? - **२७ फेब्रुवारी / विष्णू वामन शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज**
17. महाराष्ट्रातील कापूस गिरणी कोणी आणि कुठे चालु केली? - **कोवासजी नानाभाई दावर / ताडदेव**
18. मराठा साम्राज्याचे पहिले पेशवे पंतप्रधान कोण होते? - **पेशवे बाळाजी विश्वनाथ**
19. महाराष्ट्र राज्य शासनाद्वारे देण्यात येणारा सर्वोच्च्व नागरी पुरस्कार कोणता? - **महाराष्ट्र भूषण**
20. भारतीय चित्रपटसृष्टीचे जनक कोणाला म्हणतात? आणि त्यांच्या पहिल्या चित्रपटाचे नाव काय? **दादासाहेब फाळके / राजा हरिश्चन्द्र**
21. पहिला मराठी साहित्य अकादमी पुरस्कार कोणाला मिळाला? - **तर्कतीर्थ लक्ष्मण शास्त्री जोशी**
22. लोणार सरोवर कसा तयार झाला? - **धूमकेतू किंवा उल्कापाता मुळे**
23. गीत रामायण कोणी लिहिले आणि कोणी गायले? - **ग. दी. माडगुळकर / सुधीर फडके**
24. चार्ली चॅप्लिनने प्रशंसा केलेले मराठी फिल्म निर्माते कोण? - **शांताराम राजाराम वणकुद्रे उर्फ वि. शांताराम**
25. मुंबईचे पहिले राज्यपाल कोण होते? - **राजा महाराज सिंग**
26. मोठ्या राज्यांच्या गणनेत महाराष्टाचा कितवा नंबर लागतो? - **तिसरा**
27. गोबी वाळवंट पार करणाऱ्या महाराष्टातील महिला कोण? - **सुचेता कडेठाणकर**

28. महाराष्ट्रातील पहिल्या महिला डॉक्टर कोण आणि त्यांनी कोणत्या महाविद्यालयातुन पदवी मिळवली? - **आनंदी गोपाळ जोशी / Women's medical college of Pennsylvania**
29. मराठी रंगभुमी दिन कधी साजरा केला जातो? - **५ नोव्हेंबर**
30. फर्ग्युसन कॉलेजचे पहिले मुख्याध्यापक कोण होते? - **वामन शिवराम आपटे**
31. मुंबई हायकोर्टाच्या पहिल्या महिला चिफ जस्टीस कोण होत्या? - **सुजाता मनोहर**
32. महाराष्ट्रातील सर्वात लांब समुद्रकिनारा कोणत्या जिल्ह्याला लाभला आहे? - **रत्नागिरी**
33. ताडोबा उद्यान महाराष्ट्रातील कोणत्या जिल्ह्यात आहे? - **चंद्रपूर**
34. मराठी ही जगातील कोणत्या क्रमांकाची बोलीभाषा आहे? - **तेराव्या**
35. आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार कोणाला म्हणतात? - **यशवंतराव चव्हाण**
36. २०२० मध्ये कोणत्या मराठी चित्रपटाने राष्ट्रीय फिल्म पुरस्कार पटकावला? - **गोष्ट एका पैठणीची**
37. महाराष्ट्र शासनातर्फे पहिला उद्योगरत्न पुरस्कार कोणाला मिळाला? - **रतन टाटा**
38. २००३ साली अटल बिहारी वाजपेयी यांनी, __________ यांच्या १०० व्या जन्मशताब्दी निमित्त स्मरणोत्तर टपाल स्टॅम्प काढला. - **शंतनुराव लक्ष्मणराव किर्लोस्कर**
39. १९३८ च्या मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष कोण होते? - **स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर**
40. भारताच्या पहिल्या महिला राष्ट्रपती कोण? - **प्रतिभा पाटील**
41. सध्याच्या जनगणनेनुसार महाराष्ट्राची लोकसंख्या किती आहे? - **१२.६३ कोटी**
42. महाराष्ट्रातील पहिल्या महिला महाराष्ट्र केसरी होण्याचा मान कोणाला मिळाला? - **प्रतीक्षा बागडी**
43. लतादीदींनी किती भारतीय आणि परदेशी भाषांमध्ये गाणी ध्वनिमुद्रित केली? -**छत्तीस**
44. एक भारतीय सांघिक खेळ आहे, ज्याचा उगम महाराष्ट्रामध्ये झाला. सात खेळाडूंच्या दोन संघांमध्ये हा खेळ खेळला जातो. - **कबड्डी**
45. या खेळात वापरल्या जाणाऱ्या चपट्या लाकडी गोल ठोकळ्यांना -------- म्हणतात. हा एक महाराष्ट्र व अन्य राज्यांमध्ये प्रचलित असलेला एक पारंपारिक खेळ आहे. - **लगोरी**
46. बाबा आमटे यांचे संपुर्ण नाव काय? - **मुरलीधर देवीदास आमटे**
47. माणिक वर्मा यांचे शालेय शिक्षण --- मध्ये झाले आणि महाविद्यालयातील शिक्षण --- मध्ये झाले - **सेवासदन / सर परशुरामभाऊ**
48. विमानोड्डाणाची पार्श्वभूमी नसुनही भारतीय वायुसेना दलाने ग्रुप कॅप्टन हा गौरवात्मक हुद्दा प्रदान केलेला खेळाडू कोण? - **सचिन तेंडुलकर**
49. डिसेंबर २०२१ ते एप्रिल २०२२ Chairman of the Chiefs of Staff Committee कोण होते? एका सुप्रसिद्ध ऑल इंडिया रेडिओ निवेदिकेचे हे सुपुत्र आहेत. - **मनोज मुकुंद नरवणे**
50. पुण्यातील 'कट्टा' संस्कृतीचे एक संस्थापक आणि प्रसिद्ध मराठी मुलाखतकार कोण? - **सुधीर गाडगीळ**
51. आधुनिक बॅडमिंटन खेळाचा जन्म ह्या शहरात झाला. - **पुणे**

**लेखिका - रसिका जोशी**
rasika_j@hotmail.com